# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/१२१/२६ दिनांक :- १५/०४/२०२६

## परिपत्रक

पनवेल महानगरपालिका सर्वसाधारण सभेसाठी महानगरपालिका हद्दीतील नागरिक तसेच पत्रकार यांचेसाठी नाट्यगृहाच्या बाल्कनी कक्षात बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, सर्वसाधारण सभेसाठी काही नागरिक तसेच पत्रकार महासभेचे थेट प्रक्षेपण (Live Broadcast) Facebook अथवा YouTube या सामाजिक माध्यमांद्वारे करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर कृती ही सभा नियम व शिष्टाचारास अनुकूल नसल्यामुळे, यापुढे सभागृहाच्या परिसरात मा. पीठासीन अधिकारी यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय कोणत्याही नागरिकास किंवा पत्रकारास महासभेचे थेट प्रक्षेपण करण्यास मनाई करण्यात येत आहे. कोणतीही व्यक्ती पुर्वपरवानगी शिवाय महासभेचे थेट प्रक्षेपण समाजिक माध्यमाद्वारे (Social Media) प्रसारित करताना आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी.

महासभेचे थेट प्रक्षेपण करणेकरिता संबंधितांनी आपला अर्ज पुर्वपरवानगीसाठी माहिती व जनसंपर्क विभागाकडे सादर करावा.

**(मा.महापौर तथा पीठासीन अधिकारी यांचे मान्यतेने व निर्देशान्वये)**

नामदेव कामठे
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

**प्रत -: माहितीस्तव सविनय सादर —**

१. मा.महापौर कार्यालय, पनवेल महानगरपालिका
२. मा.आयुक्त कार्यालय, पनवेल महानगरपालिका
३. माहिती व जनसंपर्क विभाग, पनवेल महानगरपालिका